## प्रकरण पाचवे :

## अनंत कदम हयांच्या कादंबऱ्यामधील वातावरणनिर्मिती व भाषाशैली

५.१. प्रास्ताविक पृ.५७ ते पृ.५८

५.२. 'किडे' (१९७१) हया कादंबरीमधील वातावरणनिर्मिती पृ.५८ ते पृ.६४

५.३. 'कॅन्सर' (१९८२) हया कादंबरीमधील वातावरणनिर्मिती पृ.६४ ते पृ.६९

५.४. 'किडे' (१९७१) हया कादंबरीमधील भाषाशैली पृ.६९ ते पृ.७४

५.५. कॅन्सर (१९८२) हया कादंबरीमधील भाषाशैली पृ.७४ ते पृ.८१

५.६. समारोप पृ.८१

५.७. संदर्भ व टीपा पृ.८२

प्रकरण पाचवे :

# अनंत कदम हयांच्या कादंबऱ्यामधील वातावरणनिर्मिती व भाषाशैली

## ५.१. प्रास्ताविक :

कादंबरीमधील कथानक व व्यक्तिरेखाइतकेच महत्त्व वातावरणाला आहे. कादंबरीतील कल्पिलेली व्यक्ती ज्या समाजात वावरते, त्या समाजाचे यथायोग्य चित्र कादंबरीत उमटते. माणूस आणि त्याच्या आजुबाजूचा समाज एकाचवेळी प्रत्ययाला यावा, ही अपेक्षा कादंबरीच्या वातावरणनिर्मितीत असते. कादंबरीतील वातावरण हा अनुभवविश्व आणि व्यक्तिरेखा हयांच्यामधील दुवा असतो. स्थलकाल वैशिष्टयाचे कादंबरीचे अनुभवविश्व हे निर्वात पोकळीत व्यक्त होत नाही ; तर त्याला एखादा विशिष्ट भौगोलिक परिसर, सामाजिक, सांस्कृतिक परिसर हा असावाच लागतो.

बापट-गोडबोले हे वातावरणाला कादंबरीचा पूरक घटक मानतात. ते म्हणतात, "चित्रकलेत पार्श्वभूमीने चित्रातील देखाव्यास जसा एक प्रकारचा उठाव मिळतो, इतकेच नव्हे, तर त्या चित्रातील विशिष्ट प्रसंगातील खरे मर्म कळण्यास जशी तिची मदत होते, तसेच कादंबरीतील वातावरण हे कथानक व व्यक्तिदर्शन यातील रहस्य उलगडण्यास फार उपकारक होते."[१]

साहित्याच्या सामाजिक स्वरुपाची चर्चा तेनने एका सिदधांताद्वारे केलेली आहे. 'वंश, वातावरण आणि युग हे साहित्यस्वरुप ठरविणारे घटक होत,' असे तो म्हणतो.[२] गो.म. कुलकर्णी हयांनी तेनच्या हया विधानावर आक्षेप घेतला असला, तरी ते साहित्यातील सामाजिक, राजकीय, सांस्कृतिक जीवनचित्रणचे महत्त्व मान्य करतात.

मराठीमध्ये कादंबरीमधील वातावरणाबद्दल भालचंद्र नेमांडे हयांनी मांडलेले विचार स्वीकारार्ह आहेत. ते म्हणतात, "समाजजीवनाची नोंद करणारा वाङ्:मयप्रकार म्हणून जन्माला आलेल्या कादंबरीत वास्तव हेच द्रव्य असते. सामाजिकवास्तव व व्यक्तिनिष्ठ वास्तव असे वास्तवाचे विभाजन होऊ शकत नाही. व्यक्ती आणि समाज यांच्यामध्ये हे विभाजन सर्जनप्रक्रियेला परवडणारे नाही. समाजाला आधारभूत अशा प्रेरणेवरच आजच्या सर्व सौंदर्यकृती निर्माण होतात. संपूर्ण मानवी व्यक्तिमत्त्व मांडणे म्हणजेच माणूस व समाज यांच्यामध्ये असलेले एकजिनसी संबंध मांडणे होय."[३] १९६० नंतर प्रामुख्याने शहरी जीवनावर लिहिलेल्या कांदबऱ्यामध्ये भौगोलिक आणि सामाजिक पातळीवरील वातावरणाच्या चित्रणाचा समन्वय झालेला आढळतो.

वरील पार्श्वभूमीवर 'किडे' (१९७१) व 'कॅन्सर' (१९८२) हया दोन कादंबऱ्यांमधील वातावरणनिर्मिती कशा प्रकारे आहे, हे आता आपण पाहू.

## ५.२. 'किडे' (१९७१) हया कादंबरीमधील वातावरणनिर्मिती :

जीवन आणि साहित्य हया विषयी विस्तृत जाण व भान असलेल्या अनंत कदम हयांनी 'किडे' (१९७१) हया आपल्या कादंबरीत प्रभावीपणे वातावरणनिर्मिती करुन वाचकवर्गाला जीवनातील एक वास्तव अनुभव देण्याची यशस्वी प्रयत्न केला आहे. कादंबरीतील प्रभावी वातावरणनिर्मितीमुळे अनुभविश्व हे प्रभाविपणे पुढे सरकत असते.

अनंत कदम हयांच्या 'किडे'(१९७१) हया कादंबरीत 'तो' ही प्रमुख व्यक्तिरेखा आहे . 'किडे' हया कादंबरीचा 'तो' नायक आहे. 'तो' हा एक आदर्श

नागरिकाचे प्रतिनिधित्व करणारा आहे. अनंत कदमांचा 'तो' हा अधिक प्रभावी वाटतो तो त्याभोवतालच्या प्रभावी वातावरणानिर्मितीमुळे.

'किडे' हया कादंबरीमध्ये अनंत कदमांनी संज्ञाप्रवाहाचे तंत्र वापरुन घरातील सर्वांना नकोशा झालेल्या एका तरुण बेकाराचा एका दिवसाचा दिनक्रम तपशीलवारपणे सांगितला आहे. कादंबरीची सुरुवातच 'समोरच्या मनोऱ्यातील घडयाळात सात टोले पडतात,' हया सकाळच्या सात वाजले पासून ते रात्रीच्या दहा वाजेपर्यंतचा कालावधीमध्ये 'तो' ला काय काय पहावयास मिळते, अनुभवयास मिळते, हे रेखाटण्यापुर्वी कादंबरीकार पुढील शब्दामध्ये वातावरणनिर्मिती करतो, 'फटफटीत उजाडलं आहे. अफाट निळं आकाश समोर. पूर्वेकडच्या आकाशाचा भाग उगवणाऱ्या सूर्यामुळे सोनेरी लालसर प्रकाशानं झगमगत आहे.'(पृ.१) अशा छोटया वाक्यातून सकाळच्या प्रसन्न वातावरणाची प्रचिती येते.

कादंबरीतील अनुभवविश्व पुढे सरकण्यासाठी घरासमोरील मनोऱ्याच्या घडयाळ्यांची भूमिका महत्त्वाची आहे. अनुभवविश्व पुढे सरकण्यासाठी आवश्यक असलेली वातावरणनिर्मिती मनोऱ्यातील घडयाळ्याच्या टोलामुळे जाणवते. समोरच्या मनोऱ्यातील घडयाळात सात टोले पडतात..., आठ टोले पडतात ...., नऊ टोले पडतात .... अशा पध्दतीने अनुभवविश्वाला आवश्यक असणारी त्या त्या वेळेची वातावरणनिर्मिती करण्यात कादंबरीकार यशस्वी झाला आहे.

समाजामध्ये पदाला, पैशाला, नोकरीला किती महत्त्व आहे, हे स्पष्ट करताना नोकरीमध्ये असताना व नोकरी नसताना नायकाची काय अवस्था होते ही वस्तुस्थिती कादंबरीच्या नायकाच्या वर्णनावरुन समजते. पहा: 'बहिणीनं चहाचा कप

आणून ठेवला आहे. कपाचा दांडा मोडला आहे. बशीला चीर गेली आहे. त्यानं त्या कपबशीकडं पाहुन एक घोट घेतला. चहाची चव समजली. चहाचा रंग घाणेरडा वाटतो. चहात दुधाचं प्रमाण अगदी कमी आहे. साखरही कमी आहे. उगाच कितीतरी उकळलेला. पूर्वीसारखा चहा मिळेनासा झाला आहे.'(पृ.५व६)हया वातावरणनिर्मितीमुळे समाजातील वास्तव समजून, पैसा नसला की, माणसाची किंमत कमी होते ती अगदी घरापासून. हे घरातील वातावरणातून कादंबरीकाराने प्रभावीपणे मांडले आहे. हया ठिकाणी नायक आत्मविश्वास गमावून बसल्याचे स्पष्ट होते.

चांगले विचार फक्त वाचावयाचे, बोलावयाचे असतात, हा जगाचा व्यवहार नायकाला कळाला नाही. जगामधील ही वस्तुस्थिती स्पष्ट करताना कादंबरीकाराने 'तो' च्या 'प्रिव्हेंटिव्ह ऑफिसर' पदाचा आधार घेतला आहे. त्या आधारे कशा प्रकारे भ्रष्टाचार चालातो, हे वास्तव स्पष्ट करताना कादंबरीकार म्हणतो, 'ऑफीसर्स, शिपाई आणि सोन्याचा चोरटा व्यवहार करणाऱ्या गँगसचे संधान जमलेले असायचे. कधी-कधी मोठा धंदा व्हायचा. एका वेळी पन्नास-पन्नास हजार रुपये वाटणीला यायचे.' 'तो' हया सर्वांच्या विरोधात आहे. म्हणून त्याला त्याचे सहकारी लाचलुचपत अधिकाऱ्याकडे पकडून देतात आणि तो निराश होऊन सर्वांचे आध्यात्मिक पातळीवर निरीक्षण करीत बसतो ही वस्तुस्थिती प्रकट करण्यास कादंबरीकार यशस्वी झाला आहे.

नागरीजीवन जगत असताना मध्यमवर्गीय कुटुंबाला कशा पध्दतीच्या समस्यांना सामोरे जावे लागते, हयांचे चित्रण कादंबरीकाराने हुबेहूब केले आहे. नायकाच्या पोटात कळ येते तेव्हा तो टिनपॉट उचलतो व धाडधाड जिने उतरुन खाली येतो. संडासला लाईन पाहून तो मनात चडफडतो. 'साला, कधी यावं तेव्हा लाईन ! कुठं

जावं, तिथं लाईन, गर्दी घाणरेडी गदी, एकवार पुढची माणस पाहतो व मनातल्या मनात नंबर मोजतो. त्याचा नंबर अकरवा असतो.' उभ्या चाळीत एकच संडास असल्याकारणाने हया समस्येला सामोरे जावे लागते. त्याचबरोबर 'नाकात दुर्गंधी घुसते. समाधीतले मन गुदमरते. तंद्री पार उडते. कुठून वास आला, हे पाहण्यासाठी तो इकडे-तिकडे पाहतो. चाळीच्या सभोवार गटारीचे पाणी जमा झालेले दिसते. सकाळी तर नव्हते!' पाण्याची दुर्गंधी, तुंबलेले संडास, उंदीर, घुशी, झुरळे, डास, मतदानापुरता वापर करणारे राजकरणी अशा प्रकारच्या समस्या मांडून चाळीतील मध्यवर्गीय लोकांच्या अडचणीकडे लक्ष वेधण्यासाठी तेथील समस्यांचे प्रभावी चित्रण कादंबरीकाराने केले आहे. त्याचबरोबर चाळीमध्ये राहणाऱ्या विविध नमुन्यांच्या माणसांचे वर्णन करताना कादंबरीकार लिहितो, 'प्रत्येक माणूस वेगळा वाटत आहे, त्याची चाल वेगळी आहे, प्रत्येकाच्या देहाकारात फरक आहे, प्रत्येकाच्या बोलण्यात फरक आहे आणि प्रत्येकाच्या चेहऱ्यावर प्रतिबिंबित होणाऱ्या प्रवृत्तीतही फरक ! हयाचे त्याला नवल वाटते.' प्रत्येक माणसामध्ये व्यक्तिभेद दाखविण्यासाठी वरील पद्धतीची वातावरणनिर्मिती कादंबरीकाराने केली आहे. वासनांधता, अनैतिक संबंध हयांचे सुध्दा चित्रण वातावरणनिर्मितीमुळे योग्य वाटते. 'वासनांधता ही माणसाला शरमने मानखाली घालावयास लावते. तिच्यामुळे आपल्याला नाती समजत नाहीत, भीती उरत नाही की दिवसरात्र समजत नाही,' असे चित्रण करुन फ्राईडच्या मते माणसाच्या प्रत्येक कृतीमागे कामप्रवृत्ती हीच प्रेरणा असते, हे यशस्वी वातावरणनिर्मिती करुन कादंबरीकाराने दाखवले आहे.

चाळीतील भीमा व रमा हया दोन व्यक्तिरेखांमधील भांडणाचे चित्रण करताना कादंबरीकार अनंत कदम फारच उतावीळ झाले आहेत. दोन स्त्रियांमधील

भांडण, त्यांनी फारच खालच्या पातळीवर दाखविले आहे. भांडणाच्या सुरुवातीची वातावरणनिर्मिती मात्र योग्य आहे. हयातून दोन स्त्रियांमधील मत्सर, द्वेष प्रकट होतो. 'एकाएकी आरडाओरडीचा आवाज त्याच्या कानात घुसतो. तो खडबडून जागा होतो. भिमा आणि रमा यांच भांडण जुंपलेलं आहे. दोघी हातवारे करुन तणातणा भांडताहेत. त्यांचे शब्द स्पष्ट ऐकू येतात. 'अग रांडे, तुझ्यासारखी नाय मी. नवरा असताना सतरा जणांना घेतलंस,' रमाचे शब्द.

'अगं सोदे, म्हाईत आहेत, तुझ्यासारखी पाडून संडासात टाकली न्हाइत मी पोरं,' भिमाचे शब्द.

शब्दाला शब्द वाढत जातो. भिमा आणि रमा हयांची मारामारी चालू होते. त्या लोळताहेत. एकमेकाच्या उरावर बसताहेत. एकमेकाचे केस ओढताहेत. चावे घेताहेत, बुक्के मारताहेत. स्तन बोचकारताहेत. लुगडी इतस्ततः परसरली आहेत. चोळ्यांच्या चिंध्या होऊन पडल्या आहेत.'(पृष्ठ ८३,८५) हया वर्णनावरुन हे लक्षात येते की, दोन स्त्रियामधील भांडणाचे चित्रण कादंबरीकाराने प्रभावीपणे केले असले तरी भांडणाचा शेवट मात्र त्याने अतिरंजितपणे चित्रित केलेला आहे.

कादंबरीकार अनंत कदम समाजातील वेगळ्या प्रवृत्तीच्या माणसांचे दर्शन घडवतात. स्वतःला श्रीमंत ठरवत वशिल्यावरच शिक्षण करणाऱ्या स्वार्थी प्रवृत्तीचे चित्रण बारकाईने करतात. हे चित्रण वातावरण निर्मितीमुळेच यशस्वी झाले आहे. लोकसंख्यावाढीमुळे होणाऱ्या त्रासाचे वर्णन ते पुढीलप्रमाणे करतात,

'गर्दी वाढत आहे. उंदीर बिळातून बाहेर पडतात तसे लोक इकडून-तिकडून भुरभुर रस्त्यावर येत आहेत. बसची रांग भराभर वाढत आहे. ऑफिसं सुटली वाटतं, तो

विचार करतो.' (पृ.१०१) हया वातावरणानिर्मितीतून लोकसंख्यावाढ व नोकरीचे महत्त्व दिसून येते.

नोकरी गमावल्यामुळे नायकाचे ('तो' चे) महत्त्व कमी झालेले आहे. त्याच्या लग्नाचा विषय सुरु आहे. त्याच्या धाकटया भावाला नोकरी असल्याने त्याचे महत्त्व वाढले आहे. हयाचे वर्णन कादंबरीकार पुढीलप्रमाणे करतो.

'एवढयात त्याचं लग्न कशाला गं?,' वडिलांचा आवाज.

'अहो, मुलीचा बाप सर्व खर्च करायला तयार आहे. विशेष म्हणजे ब्लॉक घेऊन द्यायला तयार आहे. आणखी काय पाहिजे?', आईचे शब्द.

'त्याचं अजून वय कुठ झालंय लग्नाच?'

'आता चोवीस वर्षाचा घोडा झाला तरी बाळच काय तो ? थोरल्या एवढा वाढवयाचा आहे का?' (पृ.१०७)

हयाचा अर्थ थोरल्या मुलग्याने (नायकाने) नोकरी गमावल्याने त्याच्या लग्नाचा विचार करण्याची आई-वडिलांना गरज वाटत नाही. म्हणून शामच्या लग्नाची बोलणी सुरु ठेवली आहे.

हया सर्व गोष्टींचे आध्यात्मिक पातळीवर निरीक्षण करुन नायकाला समजते की, आपले इथे कोणी नाही, आपल्याला काहीही किंमत नाही. कदम हयाचे वर्णन करताना लिहितात, 'जो तो मी मध्ये गुरफटलेला. एक मी दुसऱ्या मी चा विचार करीत नाही. सारे अलग अलग मी !' (पृ.१२५) समाजातील हया स्वार्थी प्रवृत्तीवर प्रकाश टाकण्यासाठी कादंबरीकाराने प्रभावी अशी वातावरणनिर्मिती केली आहे.

समाजातील वेगवेगळ्या समस्या, स्वार्थीपणा, माणुसकीपेक्षा पैशाला आलेले महत्व हयामुळे नायक 'तो' हा वैतागून जातो. तो संपूर्ण विचार करतो आणि कोणालाही न सांगता घर सोडून निघून जातो, त्याचे चित्रण पुढीलप्रमाणे येते,

'घरातील माणसे ढाराढूर झोपली आहेत. सर्व चाळ शांत आहे. घाईघाईत तो आपले कपडे घालतो. फाटक्या चपला पायात सरकवतो. वाटतं, घरातील माणसांचा निरोप घ्यावा. मन घुटमळतं. कुणाला हाक मारण्याचा धीर होत नाही. तो खाली येतो. ती जीर्ण इमारत एखादया बोटीसारखी उभी आहे. सारी चाळ निद्रिस्त आहे. गटाराच्या पाण्याकडं पाहातो. तो पाण्याचा विळखा हळूहळू फुगत आहे, हे जाणवतं.

'तो नि:श्वास टाकतो आणि वळतो. निश्चयाने वळतो. मागे पाहतही नाही. पावले झरझर सरतात.' (पृ.१२५ ते १२६)

अशा उत्कंठामधील वातावरणनिर्मितीमुळे कादंबरीच्या नायकाने घेतलेला निर्णय हा प्रभावीपणे अनंत कदम हयांनी चित्रित केला आहे.

## ५.३. 'कॅन्सर' (१९८२) हया कादंबरीमधील वातावरणनिर्मिती :

कादंबरीकार अनंत कदम हयांनी 'कॅन्सर' (१९८२) हया कादंबरीमध्ये ह्रदयनाथ पांडुरंग भोसले हया नोकरी करत, हालअपेष्टा सोसत एम्.ए. झालेल्या बेकार तरुणाची करुण कहाणी रेखाटली आहे. हया तरुणाचे चित्रण उत्कृष्ट पद्धतीने करण्यात कादंबरीकार यशस्वी झाला आहे. हया तरुणाचा म्हणजेच ह्रदयनाथाचा दारिद्रयाशी झगडा चालू आहे. हयासाठी तो सकाळी लवकर उठून कामाच्या ठिकाणी जाऊन पोहोचतो. हया संदर्भातील वातावरणनिर्मिती कादंबरीकार पुढीलप्रमाणे करतो, 'पहाटे

पाच वाजता झालेल्या घडयाळाच्या आलार्मचा खणखणाट त्याच्या कानात घुसला. त्याला त्या घडयाळाची उबग आली. काय सालं, आम्ही घडयाळाचे गुलाम होऊन बसलोय!' (पृ. ९)

अनंत कदमांनी हृदयनाथाला प्रवाहाविरुध्द पोहणारा प्रामाणिक नायक म्हणून चित्रित केले आहे. हृदयनाथाला मित्राकडून जेव्हा कॉलेजमध्ये नोकरी लागते, त्यावेळी मानकामे नावाचा मित्र वरिष्ठांशी कसे वागावयाचे, हे समजावून सांगताना म्हणतो, "हे बघ, चालवून घेण्याची वृत्ती अंगी बाणली पाहिजे. बॉसच्या विरोधी मत व्यक्त करायचं नाही. वाद तर मुळीच घालायचा नाही. तोंड एकदम बंद करायचं कारण प्रवाहाविरुध्द वाहणं कठीण आहे. दमछाक होईल." (पृ.१२)

कॉलेजमधील प्राध्यापकाची नोकरी करत असताना हृदयनाथ वर्गातल्या एका शबाना नावाच्या इराणी मुसलमान मुलीच्या प्रेमात पडतो. जातीनिष्ठ वर्गव्यवस्थेची त्याला कोंडी फोडावयाची असल्याने तो घरच्या विरोधाला न जुमानता शबानाशीच विवाहबध्द होण्याचा निर्णय घेतो. घरातून पळून जाऊन ती दोघे लग्न करण्याचे ठरवतात. त्या दिवसाची अनामिक हुरहूर चित्रित करताना कादंबरीकार लिहितो, 'शबानास यावयास अदयाप अर्धातास होतो. सरणारा एकेक क्षण त्याला युगाएवढा वाटला ! उरात धडधड !. दुपारी चारचा मुहूर्त. स्टेशनच्या घडयाळात बरोबर तीन वाजले. इतक्यात एक ट्रेन ऊसासे सोडत स्टेशनात थबकली. लोकं भराभर बाहेर येऊ लागली. गर्दी संपली. पण शबाना दिसली नाही. हृदयनाथाच्या काळजात चर्रर झालं. (पृ.७०). अशा वातावरणनिर्मितीतून कादंबरीकाराने वाचकांना अनामिक हुरहूर लावली आहे.

ह्रदयनाथ हा मराठा व शबाना मुसलमान. त्यामुळे विवाहाच्या संदर्भात वादळ माजते. आंतरधर्मीय लग्नात निर्माण होणारे पेचप्रसंग व त्यातून सुटण्यासाठी नायकाने केलेले जीवाचे रान हयाचे चित्र परिणामकारक, पण सत्य परिस्थितीचे भान राखून कादंबरीकाराने केले आहे. आंतरधर्मीयविवाह केल्याने घरातून बाहेर पडण्याची वेळ त्याच्यावर येते. राहण्याचा प्रश्न, नोकरीचा प्रश्न, पैसा नाही, हया परिस्थितीचे वर्णन करताना कादंबरीकार एका प्रसंगाचे चित्रण वाचकासमोर ठेवतो, ते असे :

'संध्याकाळी ह्रदयनाथ खिन्नसा परतला.

"चहा हवाय का,?" शबानानं विचारलं.

"चहाचं साहित्य आहे का?"

"दूध नाही. दुधाला पैसेही नाहीत."

त्यानं खिशातून एकेक रुपयाच्या पाच नोटा काढल्या आणि तिला देत म्हणाला, "हे घे. एक-दोन दिवस चालव कसंतरी. मग बघू. माझ्याकडे एक पैसा नव्हता, पायीच भटकलो." (पृ. १०३)

ग्रामीण भागामध्ये शिक्षणाची किती दुरावस्था आहे, हे सांगताना कादंबरीकार ह्रदयनाथाच्या माध्यमातून पुढील वस्तुस्थिती मांडतो,

"ही आमची शाळा. हा माझ्या गुरांचा वाडा व्होता. शाळेला देऊन टाकला म्हणून तर मी चेअरमन झालो." (पृ.१११)

आंतरधर्मीय विवाह करणाऱ्यांबरोबरच त्याच्या कुटुंबाला व होणाऱ्या मुलांनाही किती त्रास होतो, ही समस्या सुध्दा कादंबरी मध्ये आलेली आहे. ह्रदयनाथाच्या हया विवाहामुळे त्याच्या बहिणीचे विवाह सहा वर्षे रखडतात. ह्रदयनाथाच्या मुलांना

शाळेत एका वेगळ्याच प्रसंगाला तोंड दयावे लागते. ह्या वस्तुस्थितीचे हृदयद्रावक चित्रण कादंबरीकाराने केले आहे, ते असे : 'घरी पाऊल टाकलं, तोच दोन्ही पोरं धावत येऊन विचारु लागली,

"पप्पा, पप्पा आपली जात कोणती ?"

'पण तुम्हाला काय करायचं आहे जात वगैरे?"

"नाही पप्पा, सर्व मुलांनी जात सांगितली, धर्म सांगितला. बाईंनी विचारलंय. त्यांना रजिस्टरमध्ये हे भरायचं असतं." (पृ. २४८)

ह्या वातावरणनिर्मितीमधून आंतरधर्मिय विवाहाच्या दूरगामी परिणामाची प्रचिती येते.

कादंबरीचा नायक हृदयनाथ हा प्राप्त परिस्थितीशी सामना देत असताना व्यवहारापेक्षा तत्त्वाला अधिक महत्त्व देतो. कादंबरीकाराने अशा हृदयनाथाची व्यक्तिरेखा संथगतीने, पण कलात्मकरीतीने उलगडयाचा प्रयत्न केला आहे. उत्कृष्ट वातावरणनिर्मितीमुळे कथानक/अनुभवविश्व अधिक प्रभावी झालेले आहे. प्रेम, माणुसकी नष्ट झालेल्या समाजातील कादंबरीच्या नायकाचे वेगळेपणाने वावरणे आपल्याला अस्वस्थ करते.

नंदनपूर विद्यापीठात कारकून म्हणून नोकरी करताना नायक विद्यापीठीय कारभार जवळून पाहून तसेच समाजमनाची अधोगती पाहून विषण्ण होतो. ह्या संदर्भात कादंबरीकार लिहितो, 'हृदयनाथ भयंकर बेचैन झाला होता. परीक्षाबाबत चाललेल्या भ्रष्टाचारानं तो अस्वस्थ झाला होता. त्यात गेंडयाच्या कातडयासारखी मनं असलेली

माणसं गुंतलेली ! दुसऱ्याला खड्डुयात टाकायला केव्हाही तयार. हे कशाकरिता एवढं ? केवळ पैशासाठी. पैसा त्यांना सर्वस्व झालेला.' (पृ. २९१)

अशाप्रकारे, अनंत कदमांच्या कादंबरीमधील वातावरणनिर्मिती एका वेगळ्या सामाजिक जाणिवेच्या संरचनेतून निर्माण झाली आहे. एकंदरीत, घरादाराला मुकलेल्या व सामाजिक कॅन्सरने पछाडलेल्या नायकावर एकामागून एक संकटे येतात. ही संकटे वातावरणनिर्मितीमुळे प्रभावी वाटतात.

अशा प्रकारे अनंत कदम हयांच्या 'किडे' (१९७१) व 'कॅन्सर' (१९८२) हया दोन कादंबरीमधील वातावरणनिर्मितीचा अभ्यास केल्यानंतर हे आढळून येते की, कदम हयांची लेखणी योग्य पध्दतीने वातावरणनिर्मिती करण्यात यशस्वी ठरली आहे. वातावरणाच्या उत्कृष्ठ निर्मितीमुळे आपल्याला त्या-त्या परिस्थितीची कल्पना येण्यास मदत होते. त्या परिस्थितीमध्ये आपण आहोत, असे वाटते ते फक्त कादंबरीमधील वातावरणनिर्मितीमुळे, म्हणून कादंबरीमधील वातावरणनिर्मिती महत्त्वाची आहे.

अनंत कदम हयांनी 'किडे' (१९७१) हया कादंबरीमध्ये उत्कृष्टपणे वातावरणनिर्मिती करुन कादंबरी यशस्वी केली आहे. कादंबरीचा नायक ज्या-ज्या परिस्थितीचे वर्णन करतो, त्या-त्या परिस्थितीची प्रचिती देणारी वातावरणनिर्मिती काही अपवाद वगळता प्रभावी केली आहे.

कादंबरीकार अनंत कदम हयांच्या 'कॅन्सर' (१९८२) हया कादंबरीमध्ये आंतरधर्मीय विवाहास समाजाकडून किती भयंकर त्रास सहन करावा लागतो, त्याचे वास्तव चित्रण कादंबरीभर आलेले आहे. राहत्या घराचा प्रश्न, भ्रष्टाचार, अनागोंदी सरकारी कामकाज, स्वार्थीपणा हया बाबी कादंबरीमधील वास्तव वातावरणनिर्मितीमुळे

लक्षात येतात. अशा प्रकारे कादंबरीकार अनंत कदमांनी ‘कॅन्सर’ हया कादंबरीतील वातावरणनिर्मिती उत्कृष्टपणे केली आहे.

### ५.४. ‘किडे’ (१९७१) हया कादंबरीमधील भाषाशैली :

भाषा हे वाङ्:मयाच्या अभिव्यक्तीचे साधन असते. विचार आणि भावना शब्दांच्याद्वारे व्यक्त करण्याचे प्रमुख्र माध्यमही भाषाच असते. साहित्याची भाषा आणि व्यवहाराची भाषा वेगळी कशी ठरते, हे स्पष्ट करताना नेमाडे म्हणतात, “साहित्याची भाषा व्यवहाराच्या भाषेपेक्षा अधिक विस्तारशील ‘स्वतंत्र’ रचनेचे अधिक स्वातंत्र्य प्राप्त करुन देणारी आहे.”[३]

भाषा हा कादंबरीचा एक महत्त्वाचा घटक आहे. कादंबरीकाराच्या मनात कल्पनेच्या पातळीवर जे विशिष्ट अनुभवविश्व साकार झालेले असते, ते भाषेतून उमटते. अनुभवविश्वाला शोभेलशी, जीवनानुभव व्यक्त करण्यास पोषक ठरेल, अशीच भाषा कादंबरीकार निवडतो. प्रत्येक कादंबरीकाराच्या भाषाशैलीवर देशकाल परिस्थितीचा जसा प्रभाव पडतो, तसाच प्रत्येकाच्या शैलीवर त्याच्या व्यक्तिमत्वाचा, भावनिक समृध्दीचा आणि संस्कारांचाही प्रभाव पडत असतो. कादंबरीकाराची प्रत्ययकारी समर्थ भाषाच कादंबरीमधील व्यक्तिरेखा जिवंतपणे चित्रित करत असते.

कोणत्याही साहित्य कृतीचा अभ्यास करताना भाषाशैलीदृष्टया अभ्यास हा अपरिहार्य ठरतो. कादंबरीतील भाषा अनेक प्रकारचे कार्य करत असते. विविध भावनांचे आदानप्रदान करणे, भावभावनांचे प्रकटन करणे, व्यक्तिरेखांचे व्यक्तिमत्व साकार करणे असे अनेक प्रकारचे कार्य कादंबरीतील भाषा करीत असते. येथे आपणास अनंत कदम

हयांच्या 'किडे'(१९७१) व'कॅन्सर' (१९८२) हया दोन कादंबऱ्यांच्या अनुषंगाने भाषाशैली अभ्यासावयाची आहे.

'अनंत कदम हयांच्या 'किडे' (१९७१) हया कादंबरीमध्ये वास्तवनिष्ठ शैलीचे विकसित स्वरुप दिसते. कदम हयांची ही शैली प्रसन्न, सुबोधतेकडे जाणारी, नागर भाषेतील छोटया-छोटया वाक्यांमधून निर्मळ, आत्मनिष्ठ विश्लेषण करणारी, सुक्ष्म, हळवे मनाचे पोत मांडणाऱ्या आत्मक्लेषी प्रथमपुरुषी निवेदन तंत्राची आहे.वास्तवाचे आशयद्रव्य असल्यामुळे कदमांच्या कादबंऱ्या प्रथमपुरुषी निवेदकाला सामाजिकतेचा एक घटक म्हणूनच सामावून घेतात.'[४]

प्रथमपुरुषी निवेदनाचा रोख सांगितल्या जाणाऱ्या हकीकतीबरोबर तो सांगणाऱ्या व्यक्तिरेखेकडे, त्या व्यक्तिरेखेच्या दृष्टीकोनाकडे, तिच्या मन:स्थितीकडे असतो. प्रथमपुरुषी निवेदन पद्धती अवलंबताना कादंबरीकाराचे एक किंवा अनेक व्यक्तिरेखांशी तादात्मीकरण झालेले असते. अशा प्रकाराच्या निवेदनपद्धतीमुळे लेखनात जिव्हाळा निर्माण होतो. कादंबरीतून एकसूत्रीपणा येतो. पत्रे, रोजनिशी इ. चा वापर हा प्रथमपुरुषी निवेदनाचा एक उपप्रकार मानला जातो.

व्यक्तिरेखा चितंनशील असेल किंवा मनुष्यस्वभावावर समग्र दृष्टिक्षेप टाकावयाचा असेल,तरी ही पध्दत योग्य ठरते. प्रथमपुरुषी निवेदनात निवेदक ही कादंबरीतील एक व्यक्तिरेखा असल्यामुळे या कादंबरीत व्यक्त झालेले जीवन वास्तव म्हणजे एका व्यक्तिरेखेने अनुभवलेले, त्याच्या दृष्टीकोणातून आंतरिक वास्तवाचे दर्शन घडविण्याचे असते. हे प्रथमपुरुषी निवेदनाचे सामर्थ्य ठरते.

कादंबरीतून जो आशय व्यक्त करावयाचा आहे, त्याच्या आवश्यकतेनुसार कादंबरीकार निवेदनपद्धतीचा वापर करतो. कादंबरीची भाषा परिणामकारक करण्याचा कादंबरीकार आपल्या परीने प्रयत्न करीत असतो.

'किडे' (१९७१) मध्ये कदमांनी प्रथमपुरुषी निवेदन संज्ञाप्रवाहाचे तंत्र वापरुन घरातील सर्वांना नकोशा झालेल्या एका तरुण बेकाराची एक दिवसाची दिनचर्या तपशीलवारपणे सांगितलेली आहे.

'किडे' (१९७१) हया कादंबरीतील नायक कस्टममध्ये प्रिव्हेंटिव्ह ऑफिसर म्हणून काम करीत असताना लाच घेतल्याप्रकरणी तो पकडला जाऊन नोकरीतून कमी केला जातो. त्यामुळे 'तो' एक लोकांच्या टिंगलीचा विषय बनतो. कादंबरीकाराने छोटया-छोटया वाक्यामधून हे सर्व उत्कृष्ठपणे मांडलेले आहे. उदाहरणासाठी पुढील उतारा पहा :

'कितीक लोकांनी त्याच्या तोंडावर त्याची टिंगल केली होती. कितीकांनी हृदयाला बोचकारलं होतं. काही कारण नसताना ! तो तळमळायचा. जगाला का पोसावा लागतोय आपला देह! त्याला काही सुचत नाही. कुणाला प्रतिकार करणं जमत नाही. घरची माणसं अपमान करतात. मग जगाचं काय?' (पृ.५) अशा प्रकारच्या छोटया-छोटया वाक्यांमधून कादंबरीकाराने परिस्थितीची परिणामकारकता साधून नायकाच्या मनाची अवस्था नेमकेपणाने चित्रित केली आहे.

नोकरी नाही, पैसा नाही, आपोआपच समाजातील आणि घरातीलही किंमत कमी होते. नोकरी असताना समाजात मिळणारी वागणुक आणि नोकरी गेल्यावर मिळणारी वागणूक हयात पडलेला फरक घरापासूनच कादंबरीकार नमूद करतो. पहा :

'त्यांच्या धाकटया बहिणीनं त्याच्यासमोर काही एक न बोलता चहाचा कप आणून ठेवला आहे. कपाचा दांडा मोडला आहे. कपाच्या वरच्या भागाची खपली उडाली आहे. बशीला चीर गेली आहे. त्यानं त्या कपबशीकडे पाहून एक घोट घेतला. चहाची चव समजली. चेहऱ्यावर खंत उमटते.'(पृ.६) कादंबरीकाराने छोटी वाक्ये वापरुन नायकाच्या अनुभवाची प्रचीती घडवून आणली आहे.

अनंत कदमांच्या निवेदनाच्या संदर्भात आणखी एक बाब नोंदविणे आवश्यक वाटते. ती म्हणजेच त्यांची निवेदनाची सहज सुंदर, लहान लहान वाक्यांची ओघवती भाषा. ही भाषा संपूर्ण नागरी आहे. कोणत्याही साहित्याचे मूल्य हे त्या समाजातील जीवन, वास्तव आकलन तसेच त्या साहित्यातील भाषा प्रत्यक्ष अस्तित्वात आहे की नाही , हयावर अवलंबून नसून त्या साहित्यातून , त्या कलाकृतीतून भाषेच्या द्वारा जो एकूण मानवीमनाचा पट उलगडलेला असतो, त्या साहित्यातील निवेदनामधून मानवीमनाचा, मानवी अंत:करणाचा जो आढावा घेतला जातो, जी त्या मनाची मूलभूत स्पंदने तिथे अविष्कृत झालेली असतात, त्यावर अवलंबून असते. नोकरी गेलेला, हताश झालेला नायक दिवसभर काय करतो, त्याच्या मनामध्ये कोणकोणते विचार चालतात, हे सांगाताना कादंबरीकार लिहितो. 'त्याला मागचं आठवत आहे, मागचं सारं आठवत बसायचं हाच उदयोग, काहीहि आठवायचं. कोणत्याही स्मृती त्याच्या डोक्यात तरंगतात. तो त्या खुर्चीत बसून दिवसाचे कित्येक तास भूतकाळात तरंगत राहतो'.(पृ.८) घरच्यांच्या अपेक्षा पूर्ण करण्यात आपण अपयशी ठरलो. त्यामुळे माणूसकीची वागणूक मिळण्यास आपण लायक नाही, असे नायकाला वाटते.

हताश, निराश नायक जगाचा विचार करतो. प्रामाणिकपणावरचा त्याचा विश्वास उडतो. जगामध्ये पैशाला महत्त्व आहे, पैसा मिळविण्यासाठी सगळी धडपड सुरु आहे. हे सर्व प्रसंग वाचकासमोर मांडून त्यांची मने हा नायक गहिवरुन सोडतो.

अनंत कदम हयांनी हाताळलेला विषय हा गंभीर आहे. समाजामध्ये असणाऱ्या स्वार्थी प्रवृत्तीचे, भ्रष्टाचाराचे, गैरव्यवहाराचे, व्यभिचाराचे वाभाडे काढत असताना त्यांनी कादंबरीमध्ये विनोदाचा समावेश कटाक्षाने टाळला आहे. त्यामुळे कादंबरीच्या मुख्य विषयाची गांभीर्यता शेवटपर्यंत टिकली आहे. कादंबरीमध्ये निराश झालेल्या नायकाच्या भावच्छटा सादर करताना अनुभवाचा साक्षात्कार करील असेच निवेदन व भाषा असायला हवी, ही निवेदन व भाषाशैली अतिशय सूक्ष्म व आशयसंपन्न होऊन जाते. अनंत कदम हयांच्या कादंबरीलेखनाचे हेच खरे सामर्थ्य आहे.

कादंबरीकाराने प्रथमपुरुषी निवेदन तंत्राचा वापर करुन आपले निवेदन अतिशय प्रभावी बनवले आहे. त्याबरोबरच त्याचे साधेपण, सरळपण जिवंत झाले आहे ते केवळ भाषाशैलीमुळेच.

अनंत कदम हयांच्या प्रयोगशील व्यक्तिमत्वाची अभिव्यक्ती 'किडे' (१९७१) हया कादंबरीच्या भाषाशैलीतून पहावयास मिळते. प्रथमपुरुषी निवेदनाच्या भाषेतून वास्तवाकलनाच्या, मनोविश्लेषणाच्या आणि अनुभवाकडे पाहण्याच्या दृष्टीसंदर्भात कादंबरीकार अनंत कदम हे प्रयोगशील आहेत, हे लक्षात येते. अनुभवाच्या अधिकाअधिक जवळ जाण्याच्या हेतूने अनंत कदमांनी भाषेची घडण करण्याचा प्रयत्न केला आहे. पण काही ठिकाणी मात्र हा प्रयत्न उपरा वाटतो, काही ठिकाणी हा प्रयत्न कृत्रिम वाटतो.

कादंबरीकाराच्या भाषाशैलीचे आणखी एक वैशिष्टय असे की, कादंबरीचे संपूर्ण निवेदन नागर भाषेत केले आहे. भाषाशैली आणि निवेदनकौशल्य हयांचा विचार करता असे जाणवते की, निवेदनातील गतिमानता, प्रसंगावर जबरदस्त पकड, आटोपशीरपणा, स्वाभाविक विकास, संवादावर कमी भर हयामुळे आशय, अभिव्यक्ती आणि भाषा हे सर्व घटक एकजीव झाल्यासारखे वाटतात. निवेदनातील सौम्यता अनेकदा विलोभनीय व परिणामकारक ठरलेले आहे.

अशा प्रकारे प्रथमपुरुषी निवेदनतंत्राचा वापर करुन कादंबरीकार अनंत कदमांनी 'किडे' (१९७१) मधून प्रखर वास्तव सांगण्याची पारदर्शी निर्मळ शैली, सामाजिक मूल्यांचे मोजमाप आपल्या उदार नैतिकदृष्टीतून केले आहे.

## ५.५. 'कॅन्सर' (१९८२) हया कादंबरीमधील भाषाशैली :

व्यक्तिरेखांच्या मनोव्यापारांचे, परस्पर सामाजिक संबंधांचे प्रकटीकरण सहजपणे साधण्यासाठी कादंबरीकाराला संवादाची गरज भासते. विशिष्ट समाजातील माणसे, त्यांचे स्वाभाविक गुणधर्म, त्यांची जीवनपध्दती, विचारधारा हे सर्व कादंबरीकार संवादातून प्रकट करु शकतो.

घटना-प्रसंग आणि व्यक्ती हयांना एकाचवेळी साकार करण्याची शक्ती ही संवादामध्ये असते. अनुभवाच्या अभिव्यक्तीसाठी सरळ निवेदनापेक्षा संवादांची योजना उपयुक्त, जिवंत आणि प्रत्ययकारी ठरते. ज्यावेळी आशय आणि भाषा एकवटल्याचा प्रत्यय साहित्यकृतीतून येतो, त्यावेळी ती साहित्यकृती स्वाभाविक आणि अस्सल ठरते.

महानगरीय/शहरी जीवनाचा पट मोठा, विशाल, व्यापक असतो. तेथील जीवन गतिमान असते. महानगरात कामधंदयाच्या निमित्ताने, तसेच अर्थकारण व

राजकारणाच्या निमित्ताने विविध प्रातांमधील, शहरांमधील, खेडयांमधील लोक आलेले असतात. त्यांच्या तेथील समस्या वेगवेगळ्या असतात. शहरामध्ये येणारे विविध प्रातांमधील लोक येताना आपली भाषा घेऊन येतात. त्यामुळे महानगरातील भाषेत संमिश्रता येते. विविध भाषिक समुहात देवाण-घेवाण चालते. मुंबईतील माणसाच्या मराठी बोलण्यात हिंदी, इंग्रजी हया भाषांचा सर्रास होणारा वापर हा अपरिहार्य भाग बनून येतो आणि संमिश्र भाषेचा प्रत्यय येतो.

'कॅन्सर'(१९८२) या कादंबरीतील अनुभवविश्व हे महानगरीय वातावरणातील असून त्यातून महानगरातील सुशिक्षित बेकाराला भेडसावणाऱ्या समस्यांचा मागोवा कादंबरीकार अनंत कदम हयांनी घेतलेला आहे. त्यासाठी त्यांनी भाषाशैलीचा वापर कसा कला आहे, हयाची आता सविस्तर चर्चा करु.

शहरीजीवन हे गतिमान आहे, हे दाखविण्यासाठी कादंबरीकाराने वर्णन पुढीलप्रमाणे केलेले आहे. पहा :

'पहाटे पाच वाजता झालेल्या घडयाळ्याच्या अलार्मचा खणखणाट त्याच्या कानात घुसला. त्याचबरोबर त्याला जाग आली.'

'काय सालं, आम्ही घडयाळाचे गुलाम होऊन बसलोय. साडेसातला नोकरीवर गेलंच पाहिजे, दडपण आहे. पण नोकरी करण्यावाचून दुसरा जगण्याचा मार्ग काय होता?' (पृ ९).

कादंबरीचा नायक ह्रदयनाथ हा गरिबीमध्ये जगत आहे व तो चिकाटीने आपले कुटुंब सांभाळण्याचा प्रयत्न करीत आहे, हे वरील उद्‌गारांमधून लक्षात येते.

शहरी माणसांचे विचार हे तेथील परिस्थितीनुसार तयार झालेले असतात. असाच शहरी माणसांचा लग्नाविषयी असणारा दृष्टिकोन, विचार हा तेथील परिस्थितीनुसार तयार झालेला असतो. त्यांची विचारधारा तयार झालेली असते. हे सर्व हृदयनाथ व त्याची आई हया दोघांमधील संवादावरुन लक्षात येते. पहा :

"तू घरच्यांना पसंत आहेस. घरच चांगलं आहे."

"म्हणजे काय?"

"ब्लॉक आहे, इस्टेट आहे, पैसा आहे".

"हया गोष्टी माझ्या काय उपयोगाच्या ?"

'लग्नानंतर तुझी राहण्याची सोय होईल, तयार झालास तर नीलाचंही जमण्यासारख आहे. तिचा भाऊ आहे . तशी त्याची सूचना आहे.' (पृ. १६)

शहरामध्ये भेडसवणारी राहण्याची समस्या, इस्टेट, पैसा तसेच लगेचच बहिणीचे लग्न, हयामुळे हा संवाद शहरी समस्येशी निगडीत आहे.

'कॅन्सर' ही शहरी कादंबरी असल्याने त्यामध्ये बरेचशे शब्द इंग्रजी वापरलेले आहेत. हिंदी व इंग्रजी शब्दांच्या वापरामुळे संवाद अधिक प्रभावी जाणवतो. हृदयनाथ हा आपल्या राघव, दिलावर आणि दीनानाथ हया मित्रांना भेटल्यावर त्यांच्यामध्ये पुढील संवाद होतो,

"कशी काय चाललेय तुझी डिस्पेन्सरी?"

"छान चालतेय, तीन चार महिन्याला येतात."

"बरं आहे साल्याचं, विदाऊट इन्कमटेक्स चार हजार!" दिलावर म्हणाला. "सालं, एक रुपयावलं इंजेक्शन मारायंच आणि पेशंटकडून दहा रुपये घ्यायचे."

"साला, आमचे तुम्हाला पैसे दिसतात. आम्ही खरी मेहनत करतो. लोकांना बरे करतो."(पृ . २७)

अशा प्रकारच्या हिंदी व इंग्रजीच्या मिलाफामुळे मराठी भाषा अधिक जवळची वाटते. त्याचबरोबर इतर ही इंग्रजी शब्दांचा वापर आढळतो. त्यामध्ये कॉमनरुम, मास एज्युकेशन, स्टॅन्डर्ड, कंप्लेंट, युनिव्हर्सिटी, डॅडी, टयुशन, कॅटिन, डिफिकल्टीज, लायब्ररी, मॅट्रिक एअरपोर्ट, ट्रॅफिक असिस्टंट, ट्रान्झिस्टर, मेंबर्स अशा इंग्रजी शब्दांबरोबर हिंदी शब्दांचाही वापर चपखलणे झाला आहे. उदा : मेहमान, बेशरम, साफ, बेटी, छिनाल, साली, भेन्चोद, हरामजादी, याद, खुदा त्यामुळे अशा भाषाशैलीच्या वापराने कादंबरीचे अनुभवविश्व अधिक वास्तववादी वाटते.

आंतरधर्मीयविवाह केल्यानंतर समाजाकडून, नोकरीच्या ठिकाणाहून, तसेच आप्त स्वकीयांकडूनही त्रास सहन करावा लागतो. टोचून बोलणे, टोमणे मारणे, हीन वागणूक देणे, असे प्रकार घडतात, हे प्रभावीपणे हृदयनाथ आणि शबाना हयांच्या आंतरधर्मीयविवाहाच्या नंतर घडणाऱ्या घटनांमधून कादंबरीकाराने दाखविले आहे. पहा :

"शबाना, हे ठिक नाय केलंस, आमचं नाक कापलंस, बेशरम ! तुला हे करायचं होत, तर अगोदर सांगायला पायजेल होतं."

"तरी परिस्थिती नव्हतीच."

"तू त्याची आता बेटी राहिली नाहीस, आमची कोणी नाहीस."

"शाप द्या पण इथं तमाशा दाखवू नका."

"तमाशाच करणार हाय मी इथं ! बेशरम, तुझं कधी भल होणार नाय, छिनाल साली. तुला जातीत काय कुणी नव्हतं? सालं, हयाची रंडी होऊस आलीस." (पृ. ७३)

शबानाच्या काकाने अशा शब्दात आंतरधर्मीयविवाह केल्याबद्द्ल शबानाचा उध्दार केला. कादंबरीकार अनंत कदम यांनी हया परिस्थितीसाठी / अनुभवविश्वासाठी निवडलेली भाषाशैली प्रभावी आहे. हयामध्ये वापरलेल्या हिंदी शब्दांमुळे अनुभवविश्व परिणामकारक झाले आहे. पण शबानाच्या तोंडी मराठी ऐवजी हिंदी भाषा असती तर ? कारण शबाना इराणी मुस्लीम असूनसुध्दा ती शुद्ध मराठी बोलते. ती सुद्धा हिंदी बोलली असती, तर हा प्रसंग अधिक वास्तववादी झाला असता. जरी शबाना वयाच्या दहाव्या महिन्यापासून इथेच राहत असली तरी घराची संस्कृती, परिसर हयांचा परिणाम होणे अपेक्षित होते. तो तिच्या भाषेवर झालेला दिसत नाही.

कादंबरीचा नायक हृदयनाथ सर्व त्रासाला कंटाळून एका खेडेगावात हेडमास्तर म्हणून नोकरीला जातो. ग्रामीण भागामध्ये स्वातंत्र्यप्राप्तीनंतरही जातिभेद लोकांच्या मनात कितपत आहे आणि मागास जातीच्या ग्रामीण माणसांना शिक्षकाबद्दल किती आत्मीयता असते, हयाचे वर्णन फक्त प्रभावी भाषाशैलीचा वापर करुन कादंबरीकाराने पुढीलप्रमाणे केले आहे. पहा:

'मोहितेची आई फुटक्या, दांडा नसलेल्या कपात चहा घेऊन आली. गहिवरुन समोर उभी राहिली. डोक्यावरचे काही केस पिकले होते. चेहरा सुरकुतला, करपला होता. अंगावरचं चिरगुट तिनं ढोपरापर्यंत नेसलेलं होतं. त्याला भोकं पडलेली. काही ठिकाणी टाके मारलेले. कपाळाला कुंकू नाही'.

अशी गरीब परिस्थिती मोहितेच्या आईची पण शिक्षण व शिक्षकाबद्दल सहानुभूती असल्याने ती बोलू लागली.

"मास्तरानु, तुमी मला आई म्हणताव. साऱ्या आयुष्यात माज्या मुलाशिवाय कोणी हा सबद मला म्हणला नाय. वसंता माजा एकच्या एक लेक. तो जलमल्यानंतर त्याचा बाप वारला. लहानाचा मोटा केलाय. मास्तरानु, माज्या पोरावर लक्ष ठेवा वो. माजी लय इच्छा हाय त्याला सिकवायची. सारखा अभ्यास करीत असतो. मला बरं वाटतं. (पृ. ११६).

कादंबरीकराने बौदध्वाडीतील लोकांची परिस्थिती, भाषा व अपेक्षा यशस्वीपणे मांडल्या आहेत. कादंबरीकाराने सर्व परिस्थिती ग्रामीण भाषेत मांडल्यामुळे वस्तुस्थिती अधिक प्रभावी झालेली आहे.

कादंबरीचा नायक विद्यापीठात नोकरीला असताना वरिष्ठांकडून त्याचा फारच मानसिक छळ व्हायचा, त्याच्यावर कामाचा बोजा वाढायचा. विद्यापीठीय कामामध्ये भ्रष्टाचाराचे प्रमाण वाढलेले होते. असाच एका परिक्षेतील घोटाळा कादंबरीकार मांडतो, तो असा :

'एक विदयार्थी इंटर सायन्स नापास झाला. तसं जाहीर झाल्यानंतर रिझल्ट फाईल बदलून सहया करुन त्या मुलाला मार्कशिटस् आणि पास सर्टिफिकेटही देऊन टाकले.'(पृ. २११)

कादंबरीकार अनंत कदम हयांनी 'कॅन्सर'(१९८२) हया आपल्या कादंबरीमध्ये भाषाशैली ही संदर्भानुसार आणि परिस्थितीनुसार वेगवेगळी योजलेली आहे.

हृदयनाथाचे कुटुंब मूळचे कोकणी असल्यामुळे आईच्या, वडिलांच्या आणि मामांच्या तोंडामध्ये काही प्रमाणात कोकणी भाषा वापरली आहे. आंतरधर्मीय लग्नाविरुध्द हृदयनाथचा मामा आईचे कान कसे फुंकतो, हे कादंबरीकार पुढीलप्रमाणे मांडतो,

"पोरांन रजिस्टर लग्न केलान् ते केलान, पण मुसलमानाशी. ती इराण्याची पोर ! धर्म बुडवलान त्याने. बुडवलान ते बुडवलान. तुम्ही कसा बुडवता? त्यांना अजून घरात कसं ठेवलातं ? बघ बायो, तुझ्या दोन पोरी हायत. त्यांची लग्नं होणार नायत्. घरातून ही घाण काढून टाक." (पृ. ७६)

मामाच्या तोंडची ही वाक्ये आईला जवळची वाटतात ती कोकणी भाषेच्या वापरामुळे. कादंबरीकार अनंत कदमांनी कोकणी भाषा वापरत हा प्रसंग अधिक गंभीर केलेला आहे. हया सर्व भाषेमुळे वडिलांचा अपवाद वगळता अन्य व्यक्तिरेखा पारंपारिक, रुढी, रीतिरिवाज जपणाऱ्या वाटतात.

नोकरीच्या ठिकाणी इंग्रजीचा वापर अधिक परिणामकारक ठरला आहे, तसाच शबानाच्या घरच्या संदर्भात कादंबरीकाराने हिंदी भाषेचा वापर करणे आवश्यक होते. फक्त काकाच तुरळक हिंदी शब्दांचा वापर करताना दिसतात. शबानाला आलेले भावाचे पत्रसुध्दा काही शब्द वगळता (खुदा, हरामजादी) मराठीतच आहे. ते जर हिंदी किंवा ऊर्दू भाषेमध्ये असते, तर अधिक परिणामकारक ठरले असते.

झोपडपट्टी, ग्रामीण भागातील, बौध्दवाडी, नोकरीचे ठिकाण तसेच हॉस्पीटल अशा विविध ठिकाणचे वातावरण चित्रित करताना कादंबरीकाराने परिस्थितीनुसार, परिसरानुसार भाषेत बदल केला आहे. त्यामुळे त्या परिस्थितीचे व

परिसराचे नेमके आकलन होण्यास मदत होते. भाषाशैली परिस्थिती व परिसर हयांना अनुसरुन वापरलेली असल्यामुळे वातावरणनिर्मिती उत्कृष्ट झालेली आहे.

## ५.६ समारोप :

अनंत कदम हयांच्या 'किडे' (१९७१) व 'कॅन्सर' (१९८२) हया दोन्ही कादंबरीमध्ये भाषाशैलीचा वापर उत्कृष्टपणे करण्यात आला आहे. एखादा प्रसंग असो की व्यक्तिरेखा, ते तो प्रसंग किंवा व्यक्तिरेखा वाचकासमोर छोटया छोटया वाक्यांनी व संवादाच्या माध्यमातून उभी करतात, हे त्यांच्या भाषाशैलीचे खास उल्लेखनीय वैशिष्टय आहे.

'किडे'(१९७१) हया कादंबरीमध्ये पैसे घेण्यास नकार देणाऱ्या, प्रमाणिकपणे काम करणाऱ्या आणि सहकाऱ्यांकडून कट रचून पकडून देण्यात आलेल्या निराश, हतबल झालेल्या एका तरुणाचे एक दिवसाचे चित्रण आलेले आहे. हे चित्रण त्यातील प्रथमपुरुषी निवेदनशैलीच्या वापरामुळे अधिक प्रभावी झालेले आहे. 'कॅन्सर' (१९८२) हया कादंबरीमध्ये आत्मनिवदेनाची शैली वापरुन आंतरधर्मीय विवाह करणाऱ्याला समाज कसा छळतो, हे मांडण्यात, तसेच महानगरातील समस्या मांडण्यात कांदबरीकार यशस्वी झाला आहे.

* * *

## ५.७ संदर्भ व टीपा :

१. बापट प्र.वा. व गोडबोले ना.वा., 'मराठी कादंबरी : तंत्र आणि विकास,' व्हीनस प्रकाशन पुणे, तृतीय आवृत्ती : १९७३, पृ. ४६.

२. कुलकर्णी गो.म., 'तेन', 'मराठी साहित्यातील स्पंदने.' संपुर्ण प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती इ.स. १९८५, पृ. ११-१२

३. नेमाडे भालचंद्र, 'आधुनिक मराठी कादंबरीतील सामाजिक वास्तवाच्या चित्रणाचे तंत्र व शैली,' 'टीकास्वयंवर,' साकेत प्रकाशन, औरंगाबाद, प्रथमावृत्ती : १९९०, पृ. १६८

४. नेमाडे भालचंद्र, अंतर्भूत : 'मराठी साहित्य, प्रेरणा व स्वरुप' (१९५०-७५), पवार गो.मा. व हातकणंगलेकर म.द. (संपा), पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, प्रथमावृत्ती :इ.स.१९८६, पृ.५०